# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 05/01/2022 (बुधवार)

(सकाळ)

---

### चोरी

1) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 0.5 कि. मी. अंतरावरील पोलिस क्वॉटर 9 राधाकृष्ण वार्ड रामटेक येथे दिनांक 02/01/2022 चे 10.00 वा. चे 13.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– राजाराम देवराम धार्मिक, वय 37 वर्ष, रा. क्वॉ. नं. 09 पोलीस क्वॉटर रामटेक यांचे राहते घराचे अज्ञात आरोपीने कुलुप न लावलेल्या खुल्या दरवाज्यातुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने घरात बेडरुमधील लोखंडी आलमारीचे लॉकरमध्ये पांढ–या गुलाबी कलरची पर्स ज्यात ठेवलेले एकुण 10,45,00/–रु. व सोन्या–चांदीचे दागिने व रोख रक्कम 35,000/–रु. असा एकुण कि. 1,39,500/–रु. किंमतीचा मुददेमाल अज्ञात आरोपीने चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि स्वाती यावले मो. नं. 9011655284 या करीत आहे.

2) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 500 कि. मी. अंतरावरील एमआयडीसी बोरी चौक येथे दिनांक 04/01/2022 चे 14.00 वा. ते 14.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रियंका नरेंद्र मौदेकर वय 30 वर्ष रा. सी टॉवर महाकाली नगरी देवाडा, चंद्रपुर हि तिच्या आईसोबत सेलु जि. वर्धा येथुन बुटीबोरी येथे खाजगी बसने उतरले व बुटीबोरी येथुन खाजगी बसने चंद्रपुर येथे जाणेकरीता बसमध्ये चढत असतांना फिर्यादीच्या आई कडे असलेल्या बॅगची चैन अज्ञात आरोपीने उघडुन त्यामध्ये असलेले सोन्याचे दागीने एकुण कि. 3,08,000/–रू., मोबाईल रेडमी नोट 4 कंपनीचा किमंत 5,000/–रू. 2,000/–रू. रोख, एक हॅन्ड बॅग पिवळया रंगाची किमत 00.00 रु जुनी वापरती असा एकुण कि. 3,15,000/–रू. मुददेमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री कांता रेजीवाड मो.क्र. 983482579393 या करीत आहे.

### विनयभंग

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– दिनांक 04/01/2022 चे 07.45 वा. चे 11.00 वा. दरम्यान अल्पवयीन फिर्यादी/पीडित वय 16 वर्ष ही कॉलेजमध्ये जात असतांना आरोपी नामे– रत्नपाल दशरथ मेश्राम, रा. कटरे ले–आऊट टाकळघाट याने 'मी तुझ्यावर खूप प्रेम करतो असे म्हणून तू माझ्यासोबत फिरायला चल' असे म्हटले. त्यावरून पीडित मुलीला भिती वाटल्याने त्याचे गाडीवर बसली असता आरोपीने गाडी वर्धा रोडकडे नेवून थांबवीली व पीडित मुलीचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला व परत शाळेजवळ आणून सोडले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354 अ भादंवी सहकलम 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि काकडे मो. क्र. 9156283876 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावरील जुनी कामठी येथे दिनांक 01/01/2022 चे 14/00 वा चे पुर्वी संजय शिवराम आकरे वय 50 वर्ष रा. जाळेगाव वडोदा भंडारा रोड तह. कामठी जि. नागपुर तसेच मृतकाचे भाऊ रामाजी आकरे व गावातील संजय ठाकरे हे ठेकेदार संजय मोटघरे यांचे साईडवर ईलेक्ट्रीक सिमेंट पोल गडयात उभे करतेवेळी अचानक मृतक यांचे पाय नाल्यातील खडयात फसल्याने ईलेक्ट्रीक पोल गडयात उभे करतेवेळी मधातुन तुटला व वर असलेला ईलेक्ट्रीक हाय टेंशन लाईनचे तारांना लागल्याने मृतक हा सिमेंट पोल ओला असल्याने त्याला पकडुन हाय टेंशन लाईनचा विद्युत करंट लागला व तो खाली पडुन बेशुद्ध झाला. त्याला लगेच आशा हॉस्पीटल येथे उपचारा करिता भर्ती केले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. त्यावरून पोस्टे कामठी येथे 00/22 कलम 174 जाफौ प्रमाणे नोंद करण्यात आली व त्याचे मर्ग चे कागपत्रे पोस्टे कन्हान येथे प्राप्त झाल्याने सदरचा मर्ग दाखल केला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रामाजी शिवराम आकरे, वय 50 वर्ष, रा. जाळेगाव वडोदा भंडारा रोड तह. कामठी जि. नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सा.फौ गणेश पाल मो.न. 9552517268 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर